जा.क्र.पोआ/ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती /जाहिरनामा/०७/२०२४ सोलापुर शहर दि.०८/२०२४

## जाहिरनामा

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१(१९५१ चा अधिनियम क्रं.२२) चे कलम ३३(१)(व)अन्वये अधिसुचना**

ज्या अर्थी दिनाक ०४/०८/२०२४ रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीची सांगता (विसर्जन) मिरवणुक सोलापूर शहरात काढण्यात येणार आहे. मिरवणुकीमुळे मिरवणुक मार्गावर लोकांची मोठया प्रमाणात गर्दी होणार आहे. यादरम्यान मिरवणुकीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी येणाऱ्या वाहनांचा अडथळा निर्माण होवून वाहतुकीची कोंडी होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता खालील मार्गावर जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी एम. राज कुमार , पोलीस आयुक्त, सोलापूर शहर मला प्राप्त असलेल्या महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चा अधिनियमन क्रं.२२ चे कलम ३३(१)(ब) आणि प्राप्त सर्व अधिकारान्वये खालील आदेश देत आहे.

**आदेश -**

दिनांक ०४/०८/२०२४ रोजीचे दुपारी १३.०० ते रात्री २४.०० वा पर्यत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीची सांगता (विसर्जन) मिरवणुक मार्गावर मिरवणुकीत सामील होणारी वाहने वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनांना जाणेस व येणेस बंद करण्यात येत आहे.

**(अपवाद - पोलीस वाहने, अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. ॲम्बुलन्स, दवाखान्याचे वाहने, अग्निशामक, संरक्षित व्यक्तीची वाहने व पोलीस ज्या वाहनास परवानगी देतील अशी वाहने)**

**बंद करण्यात आलेला मार्ग(मिरवणुक मार्ग)**

लोकशाहिर आण्णाभाऊ साठे चौक - रामलाल चौक - डॉ. बाबासाहेब आबेडकर चौक - चार हुतात्मा पुतळा - खान मजिद - सरस्वती चौक - नविवेस चौकी - मॅकेनिक चौक - छ.शिवाजी महाराज चौक - ॲम्बेसेडर हॉटेल

**पर्यायी मार्ग**

१) विजापूर रोडवरुन मंगळवेढाकडे जाणा-या वाहनांना पत्रकार भवन चौक - महावीर चौक - गुरुनानक चौक - संत तुकाराम चौक - अशोक चौक - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड - शेळगी क्रॉस रोड - जुना तुळजापूर नाका - कारंबा नाका - जुना पुना नाका - नवीन बायपास मार्गाने इच्छित स्थळी

२) मंगळवेढा कडुन येणा-या वाहनांना नवीन बायपास रोडने पुणे हायवे बाळे - जुना पुना नाका - कारंबा नाका - जुना तुळजापूर नाका - शेळगी क्रॉसरोड - मार्केट यार्ड - हैद्राबाद रोड ते इच्छित स्थळी

३) रेल्वे स्टेशनहुन कडुन बसस्थानक, छ.शिवाजी म.चौक कडे जाणा-या वाहनांना रेल्वे स्टेशन - सातरस्ता - रंगभवन चौक - विजापूर वेस - बाकळे प्रेस कॉर्नर - भावसार पथ - समाचार चौक - कोंतम चौक - कुंभारवेस - बलीदान चौक ते इच्छित स्थळी.

४) जुना पुना नाका कडून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनधारकाने जुना पुना नाका - जुना कारंबा नाका - जुना तुळजापूर नाका - बोरामणी नाका - शांती चौक - सातरस्ता ते रेल्वे स्टेशन **किंवा** ॲम्बेसेडर हॉटेल - निराळे वस्ती पुल - एम.एस.सी.बी. ऑफीस समोर - शेटे नगर रेल्वे बोगदा - मरिआई चौक - नागोबा मंदिर - रामवाडी दवाखाना - मोदी स्मशानभुमी - मोदी चौकी समोर - रेल्वे स्टेशन

**जड वाहतुक जाण्यासाठी पर्यायी मार्ग**

विजापूर कडून येणाऱ्या व जाणाऱ्या जडवाहनांनी नवीन बायपास रोडचा वापर करावा. अक्कलकोट कडून येणाऱ्या वाहनधारकांनी नवीन अक्कलकोट नाका - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड या मार्गाचा वापर करावा तसेच मंगळवेढा कडून येणाऱ्या वाहनधारकांनी नवीन बायपास रोडचा वापर करावा.

या जाहिरनाम्याने काढलेला आदेश हा दिनांक ०४/०८/२०२४ रोजी दुपारी १३.०० ते रात्री २४.०० वा. पर्यत अंमलात राहील. सदर आदेशाचा भंग करणारा कायदयाप्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

हा जाहीरनामा माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द केला आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर

प्रति,

पोलीस उपआयुक्त मुख्यालय/परिमंडळ/ गुन्हे विशा, सोलापूर शहर
सहायक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष, विभाग १, विभाग २, वाहतुक शाखा, गुन्हे शाखा, सोलापूर शहर
प्रभारी अधिकरी, सर्व पोलीस टाणे, सोलापूर शहर

प्रत,

प्रभारी अधिकारी माहीती कक्ष, सोलापुर शहर.

२/- सदरचा जाहीरनाम हा सर्व वर्तमान पत्र/वृत्तवाहिनीवर प्रसिध्दी करावा.

Scanned with CamScanner